जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (DIU) स्मार्ट, नाशिक
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (ATMA), नाशिक
Agricultural Technology Management Agency, Nashik
(SAMBHAJI CHOWK, UNTWADI ROAD, NASHIK-422002 Ph- 0253/2973335) Email- nashik.diu.smart@gmail.com.

जा.क्र.आत्मा/स्मार्ट/अ.लेखापरिक्षण/८८४ /२०२५ दिनांक १२ /०६/२०२५

प्रति,

मा.अंतर्गत लेखापरिक्षक,स्मार्ट प्रकल्प
मे.एस.के.पतोडीया ॲण्ड असोसिएट्स
चार्टर्ड अकौंटंटस्,

विषय :- मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय आणि ग्रामिण परिवर्तन (SMART) प्रकल्पांतर्गत सन २०२४-२५ मधील H-1 अंतर्गत लेखापरिक्षण मुद्दा वगळणेबाबत...

संदर्भ :- १. ऑनलाईन MIS प्रणालीतील सन २०२४-२५ मधील अंतर्गत लेखापरिक्षण मुद्दा क्र.-१
२. पी.आय.यु. पूणे यांचे पी.आय.यु/आस्था/८४२/२३-२४ दि.२७ जुन २०२४ रोजीचा ई-मेल

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये सविनय सादर करण्यात येते की, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (SMART) प्रकल्पांतर्गत सन २०२४-२५ मध्ये ऑनलाईन MIS प्रणालीतील अंतर्गत लेखापरिक्षण मुद्दा क्र.-१ मध्ये दिनांक ०८-०७-२०२४ रोजी झालेल्या नाशिक जिल्हयातील स्मार्ट प्रकल्प आढावा सभेचा Geo-tag Photo मध्ये स्मार्ट प्रकल्पाचा बॅनर दिसत नसल्याचा आक्षेप नोंदवीलेला आहे.

संदर्भ क्र.२ नुसार दिनांक २७ जून २०२४ रोजी प्राप्त ई-मेल नुसार पी.आय.यु कृषि स्मार्ट प्रकल्प पूणे राज्य स्तरावरुन दिनांक ०८-०७-२०२४ रोजी श्रीमती. उज्वला बाणखेले –कृषि व्यवसाय व्यवस्था तज्ञ, पी.आय.यु पूणे राज्यस्तरीय पालक नोडल अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक जिल्हयाचा स्मार्ट प्रकल्पाची आढावा सभा घेणेबाबत पत्र या कार्यालयास प्राप्त झाले होते. त्यानुसार दिनांक ०८-०७-२०२४ रोजी रामेती नाशिक यांच्या दालनात आढावा सभा आयोजीत करण्यात आली होती, व सदर आढावा सभेचे Geo-tag Photo देखील काढण्यात आलेले होते.

सदर आढावा सभेमध्ये पीपीटी प्रझेन्टेशन केल्याने आढावा सभेचा डिजीटल बॅनर असल्याने तो फोटोत सुस्पष्ट दिसत नाही, तसेच यापुढे भविष्यात सदर आढावा सभेचा दिनांकित बॅनर दिसेल असा डिजीटल फ्लेक्स फोटो सादर करण्याची खबरदारी या कार्यालयाकडुन घेतली जाईल तरी अंतर्गत लेखापरिक्षक महोदय यांनी सदर आक्षेप वगळावा, ही विनंती.

(अभिमन्यु काशिद)
प्रमुख,जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट जिल्हा-नाशिक

प्रत:- मा.मुख्य अधिकारी,विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) कोकण विभाग, कोकण महिलाविकास महामंडळ भवन

Scanned by CamScanner